**मुंबई मेट्रो मार्गिका-३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) प्रकल्पाच्या सुधारित प्रकल्प किंमतीस केंद्र शासनाच्या मान्यतेस अनुसरून प्रकल्पाची सुधारीत किंमत व सुधारीत वित्तीय आराखडा याबाबत सुधारीत शासन निर्णय निर्गमित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : एमएमआर-३३१६/प्र.क्र.९७ (भाग-४)/नवि-७,**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- २ जुलै, २०२४.

**संदर्भः-**

१) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एमआरडी-३३११/प्र.क्र.१४९/नवि-७, दि.०३.०३.२०१४.

२) केंद्रीय शहर विकास मंत्रालयाचे पत्र क्रमांक No.K-१४०११/३६/२००९-Metro/MRTS-II (Vol.III), दिनांक १८.०७.२०१४.

३) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एमएमआर-३३१६/प्र.क्र.९७ (भाग-४)/नवि-७, दिनांक २५.०८.२०२२.

४) केंद्रीय शहर विकास मंत्रालयाचे पत्र क्रमांक No.K-१४०११/२०/२०१६/MRTS-II, दिनांक २९.०२.२०२४.

**प्रस्तावनाः-**

मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-३ प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाचा ५०:५० सहभाग असलेल्या मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लि. या एसपीव्ही कंपनीमार्फत करण्यात येत आहे. केंद्रीय शहर विकास मंत्रालयाचे संदर्भाधीन पत्र दिनांक १८ जुलै, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. शासनाने संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ०३ मार्च, २०१४ अन्वये प्रकल्प अंमलबजावणीस मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाचा मूळ मंजूर पुर्णत्व खर्च रु.२३,१३६ कोटी इतका असून त्यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा समभाग, कर, जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत खर्चापोटी केंद्र व राज्य शासनाचे बिनव्याजी दुय्यम कर्ज, जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेचे बाह्यकर्ज इत्यादी प्रमुख माध्यमातून निधी उपलब्ध करावयाचा आहे. सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या हिश्श्याचा समभाग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत वहन करण्यात येत आहे. सद्यस्थितीत प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

सदरहु प्रकल्प डिसेंबर, २०२१ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजित होते. तथापि, मुंबईची स्थानिक व भौगोलिक परिस्थिती पाहता प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान आलेल्या तांत्रिक अडचणी, जमीन अधिग्रहणामधील किंमतवाढ, पुनर्वसन तसेच कोविड-२०१९ व कारशेडच्या जागा निश्चितीबबातचे असलेले प्रश्न विचारांत घेऊन मुळ प्रकल्प किंमत रु. २३,१३६ कोटीमध्ये रु. १०,२६९.८२ कोटी इतक्या रक्कमेने वाढ झाल्याने प्रकल्पाच्या रु.३३,४०५.८२ कोटी खर्चाच्या सुधारीत वित्तीय सहभाग

आराखड्यासह राज्य शासनाने दि. २५ ऑगस्ट, २०२२ रोजी मान्यता दिली आहे. सदरची सुधारित प्रकल्प किंमत रु ३३,४०६ कोटी ही सन २०२१ पर्यतची अंदाजित किंमत आहे. त्यानंतर COVID-१९ च्या प्रादुर्भावामुळे आलेले अडथळे व आरे कारशेडवरील स्थगिती यामुळे प्रकल्प जून, २०२४ पर्यंत कार्यान्वयित होणे अपेक्षित आहे. तथापि, सन २०२१ ते सन २०२४ या कालावधीत सल्लागाराचे अतिरिक्त शुल्क- रु.५२० कोटी, पुनर्वसन व पुनर्वसाहतीकरण यावरील अतिरिक्त खर्च -रु. ७०० कोटी, स्थापत्य व प्रणाली कामांतील भाववाढ- रु.१५०० कोटी, कार्यालयीन खर्च - रु.१५० कोटी, करांवरील खर्च- रु.१००० कोटी असा एकूण रु. ३८७० कोटी याप्रमाणे संभाव्य खर्चवाढीस तत्वतः मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार रू. ३७२७५.५० कोटी सुधारीत किंमतीचा प्रस्ताव दि.३०.०८.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे केंद्र शासनास पाठविण्यात आला होता. त्यानुषंगाने केंद्र शासनाने संदर्भाधीन दिनांक २९.०२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये प्रकल्पाच्या रू. ३७१७६ कोटी रकमेच्या सुधारीत किंमतीस व सुधारीत वित्तीय आराखड्यास मान्यता प्रदान केली आहे.

तसेच दिनांक २६ जून, २०२४ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत मुंबई मेट्रो मार्ग-३ प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सदर प्रकल्पाच्या केंद्र शासनाने मंजूर केलेल्या सुधारीत वित्तीय आराखड्यानुसार राज्य शासनाच्या हिश्श्याची समभागाची वाढीव रू. ११६३.३ कोटी रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने देण्याऐवजी थेट राज्य शासनाद्वारे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मा.मंत्रिमंडळाने दि.२६ जून, २०२४ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार समभागाची रक्कम राज्य शासनाने देण्याच्या अनुषंगाने व केंद्र शासनाने दि.२९.०२.२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेच्या पार्वश्वभूमीवर सदर प्रकल्पाच्या सुधारीत किंमत व सुधारीत किंमतीच्या आराखड्यास अनुसरून सुधारीत शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक आहे. सबब, संदर्भाधीन शासन निर्णय दि. २५ ऑगस्ट २०२२ रोजीच्या शासन निर्णयामध्ये अंशत: बदल करून सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याचा निर्णय घेतला आहे:-

**शासन निर्णयः-**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांनी सादर केलेल्या मुंबई मेट्रो मार्गिका-३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) प्रकल्पाच्या सुधारित सविस्तर प्रकल्प प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य शासनाने यापूर्वी दि.२५.०८.२०२२ रोजी दिलेली मान्यता व त्यानुसार केंद्र शासनाने दि.२९.०२.२०२४ रोजी दिलेली मान्यता व मा.मंत्रिमंडळाने दि.२६ जून, २०२४ रोजी दिलेली मान्यतेनुसार समभागाची रक्कम थेट राज्य शासनाद्वारे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला उपलब्ध करून देण्यास दिलेली मान्यता विचारात घेऊन संदर्भाधीन शासन निर्णय दि. २५ ऑगस्ट २०२२ रोजीच्या शासन निर्णयामध्ये अंशत: बदल करून पुढीलप्रमाणे सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे :-

१. मुंबई मेट्रो मार्ग-३ प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यता रु.२३,९४२ कोटी मध्ये रु.१३३३३.५० कोटी इतकी वाढ झाल्याने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. ने सादर केलेल्या व केंद्र शासनाने मंजूर केलेल्या रु.३७२७५.५० कोटी इतक्या सुधारीत प्रकल्प किंमतीस राज्य शासनाची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रकल्पाच्या सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालास सोबतच्या **परिशिष्ट-अ** येथील रु.३७२७५.५० कोटी खर्चाच्या सुधारित वित्तीय सहभाग आराखड्यासह राज्य शासनाची सुधारीत मान्यता देण्यात येत आहे.

३. प्रकल्पाच्या सुधारित वित्तीय आराखड्यानुसार, राज्य शासनाच्या समभागाची मूळ मंजूर रक्कम रु.२४०२.७० कोटी वरुन रु.३५६६ कोटी होत आहे. प्रकल्पाच्या मूळ वित्तीय आराखड्यानुसार राज्य शासनाच्या समभागाची रक्कम रू. २४०२ कोटी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला अदा करण्यात आली आहे. तथापि, आता प्रकल्पाच्या सुधारित वित्तीय आराखड्यानुसार राज्य शासनाच्या समभागापोटी देय वाढीव रक्कम रु.११६३.३० कोटी रक्कम राज्य शासनाद्वारे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. प्रकल्पाच्या सुधारित वित्तीय आराखड्यानुसार राज्य शासनाने भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत आणि कर यापोटी द्यावयाची मूळ देय रक्कम रु.२४२१.१० कोटी वरून रु.४८३५.५५ कोटी अशी होत आहे. त्यामुळे राज्य शासनाकडून सुधारित खर्चापोटी वाढीव देय रु.२४१४.४५ कोटी रकमेचे वाढीव बिनव्याजी दुय्यम कर्ज मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. सुधारित वित्तीय आराखड्यानुसार जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेचे (JICA) कर्ज रू.१३,२३५.०० कोटी वरुन रू.२१२८०.४५ कोटी इतके होत आहे. सदर वाढीव रू.८०४५.४५ कोटी रक्कमेचे कर्ज घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. JICA कडून सदरचे वाढीव कर्ज घेण्यासाठी केंद्र शासन, JICA यांच्याबरोबर समन्वय साधण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

६. सदरहू वाढीव कर्जासाठी जायका (JICA) च्या अटी व शर्ती पूर्वीच्याच वा त्याहीपेक्षा फायदेशीर राहतील याबाबत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. ने प्रयत्न करावा.

७. उपरोक्त अनुक्रमांक १ ते ६ येथे नमूद तरतुदी वगळता इतर तरतुदी संदर्भाधीन क्रमांक ३ येथे नमूद दि.२५.०८.२०२२ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणेच असतील.

८. सदरचा शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.१०९/का.१४४४, दि.०७.०३.२०२४ आणि क्र.९८/का.१४४४, दि.०५.०३.२०२४ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१६१/व्यय-३, दिनांक १८.०४.२०२४ व क्र.१४१/व्यय-३, दिनांक १७.०५.२०२४ अन्वये प्राप्त सहमती/अभिप्राय व यापूर्वी दिनांक १०.०८.२०२२ रोजी मा. मंत्रीमंडळाने

घेतलेला निर्णय तसेच अनुक्रमांक ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य शासनाच्या समभागापोटी देय वाढीव रक्कम राज्य शासनाद्वारे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला उपलब्ध करून देण्यास मा.मंत्रिमंडळाने दि. २६ जून, २०२४ रोजी घेतलेला निर्णय याच्या अधीन निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०७०२१३२६१५७१२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरिने स्वाक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( विजय चौधरी )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे प्रधान सचिव, मुंबई ४०००३२
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
६. मा. सचिव, शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार, निर्माण भवन, नवी दिल्ली
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१२. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१३. पोलिस आयुक्त, मुंबई
१४. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रायव्हेट लिमिटेड().
१५. जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर
१६. सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई.
१७. संचालक, नगर रचना, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे.
१८. सह सचिव, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१९. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२०. निवड नस्ती (नवि-७).

## परिशिष्ट-अ

### प्रकल्पाचा सुधारीत वित्तीय सहभाग आराखडा

| अ.क्र. | निधी उभारणीचा तपशील | मूळ मंजूर हिस्सा (रु.कोटी) | केंद्र शासनाने मान्य केल्यानुसार सुधारित हिस्सा (रु.कोटी) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | केंद्र शासनामार्फत समभाग | २४०२.७० | ३५६६.०० | ९.५७ |
| २. | राज्य शासन आणि/किंवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामार्फत राज्य शासनाचा समभाग* | २४०२.७० | ३५६६.०० | ९.५७ |
| ३. | केंद्र शासन यांच्यामार्फत दुय्यम कर्ज (एकूण केंद्रीय कराच्या ५०%) | १०२४.५० | १५७१.५० | ४.२२ |
| ४. | राज्य शासनाकडून बिनव्याजी दुय्यम कर्ज (खाजगी भूसंपादनावरील खर्च + पुनर्वसन व पुनर्वसाहत खर्च+ एकूण केंद्रीय कराच्या ५०% + राज्य/स्थानिक कर) | २४२१.१० | ४८३५.५५ | १२.९७ |
| ५. | मालमत्ता विकास, परिणाम शुल्क (Impact Fee)/ सुधारणा कर (Betterment Tax) | १०००.०० | १०००.०० | २.६८ |
| ६. | भागधारकाकडून अर्थसहाय्य (Mumbai International Airport Limited) | ७७७.०० | ७७७.०० | २.०८ |
| ७. | एमएमआरडीएकडून अनुदान | ६७९.०० | ६७९.०० | १.८२ |
| ८. | जपान आंतरराष्ट्रीय संस्थेकडून कर्ज | १३२३५.०० | २१२८०.४५ | ५७.०९ |
| **एकूण प्रकल्प किंमत** | | **२३९४२.००** | **३७२७५.५०** | **१००.००** |

टीप: *प्रकल्पाच्या मूळ वित्तीय आराखड्यानुसार राज्य शासनाच्या समभागाची मंजूर हिस्सा रक्कम रू. २४०२ कोटी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला वितरीत करण्यात आली आहे. आता प्रकल्पाच्या सुधारित वित्तीय आराखड्यानुसार राज्य शासनाच्या समभागाच्या रू.३५६६ कोटी रकमेतील वाढीव रक्कम रु.११६३.३० कोटी इतकी रक्कम राज्य शासनाद्वारे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला उपलब्ध करून देण्यात येईल.

*************